# Positive Story of Nagpur Rural Police

## दिनांक १६/०४/२०२५

## मा. मुख्यमंत्री यांच्या १०० दिवसांच्या उपक्रमाअंतर्गत नागपूर ग्रामीण जिल्हया मध्ये अवैध अंमली पदार्थ तस्करी विरोधात राबविण्यात आली विशेष मोहीम

दिनांक ०१/०३/२०२५ रोजी ठाणे शहरात झालेल्या गुन्हेगारी आढावा बैठकीत महाराष्ट्राचे मा. मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार, अंमली पदार्थांची तस्करी आणि वाढत्या सेवनाला आळा बसण्यासाठी संपूर्ण नागपूर ग्रामीण जिल्हयात विशेष कारवाई मोहीम राबविण्यात आली.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांनी अंमली पदार्थ विरोधी कारवाई विशेष मोहिमे अंतर्गत दिनांक ०६/०३/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व बीट अधिकारी आणि अंमलदारांची बैठक घेतली. सदर बैठकीत त्यांना त्यांच्या हद्दीतील **अंमली पदार्थाचा साठा, विक्री ,किंवा वाहतुक करणारे आरोपीतांवर** तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्याचे आणि कडक कारवाई करण्याचे आदेश दिले गेले. पानटपरी, पोलीस स्टेशन हद्दीतील शाळा आणि महाविद्यालयांच्या जवळच्या परीसरात अंमली पदार्थ विक्री होते किंवा कसे यावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले. **तसेच अवैध अंमली पदार्थाचा साठा, विक्री ,किंवा वाहतुक करणारे आरोपीतांवर कारवाई करणे कामी स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी आणि अंमलदार यांचे स्वतंत्र विशेष पथक तयार करण्यात आले.**

उपविभागीय स्तरावर, नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व सहा उपविभागीय अधिकारी यांनी एनडीपीएस कायदयान्वये दाखल होणाऱ्या प्रत्येक प्रकरणावर वैयक्तिकरित्या लक्ष देवुन आणि अंमलीपदार्थ पुरवठा करणारे आणि विकणारे यांची साखळी ओळखुन, पुरवठा करणारे स्त्रोत शोधुन त्यांच्या अवैध कामावर आळा बसणेसाठी त्यांच्या वर कठोर कारवाई करण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या.

मा. पोलीस अधिक्षक ,नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी राबविलेल्या या विशेष मोहीमेमुळे खालील अंमलीपदार्थ विक्रेत्यांचे स्त्रोत निष्पन्न करून त्यांच्यावर कारवाई करण्यात आली.

- नागपूर उपविभागात, पोलीसांनी गुप्त बातमीदाराच्या खबरेवरून आरोपी **शकील जब्बार शेख रा. टाकळघाट** याला अंमली पदार्थ विक्री करतांना एमआयडीसी पोलीस हद्दीतील टाकळघाट गावातून ताब्यात घेवुन अटक केली होती. आणि त्याच्या ताब्यात मिळुन आलेल्या अंमलीपदार्थ चा पुरवठा त्याला कोणी केला या बाबत शोध घेण्यासाठी पोलीस पथक नागपूर शहरातील धंतोली—इमामवाडा भागात पाठवण्यात आली.
- रामटेक उपविभागात अंमलीपदार्थ बाळगुन विक्री करणारे आरोपी नामे **तुळशीराम मारोतराव कठाणे रा शिवाजी वार्ड रामटेक याला रामटेक येथुन आणि स्वप्नील देविदास कोल्हे**, रा. घोगरा रोड, पारशिवणी जि. नागपुर याला पारशिवणीत अटक करण्यात आली.
- कन्हान उपविभागात, पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत अंमली पदार्थ जवळ बाळगुन विक्री करणारा आरोपी नामे **चंदारी निनाकु सहानी, रा. शिवनगर, कांद्री कन्हान आणि हर्षल उर्फ प्रवीण दत्तराज डांगोरे रा.टेकडी ,महाराज नगर कन्हान** आणि खापरखेडा पोलीस स्टेशन अंतर्गत आरोपी नामे **सानु उर्फ केशव ओमबहादूर थापा रा चनकापुर** आणि **नितेश अशोक सिंग, रा. वार्ड क्र. ३ वलनी कॉलनी** यांना अटक करून पोलीसांनी सखोल तपास केला असता त्यांचा मध्य प्रदेशातील एका अंमलीपदार्थ पुरवठादाराशी संबंध असल्याचे तपसात उघड झाले.
- सावनेरमध्ये अशाच प्रकारे अंमलीपदार्थ विक्री करणारा **सुरेंद्र बर्वे आणि बाबू ठाकूर** यांना अटक करण्यात आली आणि त्यांनी छिंदवाडा, मध्यप्रदेशातील येथुन अंमली पदार्थ आणल्याबाबत माहीती दिली आणि एका प्रकरणातराजस्थानमधील ट्रक चालकांचाही सहभाग होता.

- काटोल उपविभागातील नरखेड पोलीस स्टेशन येथील गुन्हयातील अंमली पदार्थ पुरवठा करणारा आरोपी **नामे बाबू गुलाबराव वर्मा रा. नरखेड** याच्यावर कारवाई करण्यात आली. पुढील अंमली पदार्थ पुरवठा करणारे स्त्रोत शोधण्यासाठी तपास पथक पांढुर्णा, मध्यप्रदेश येथे पाठवण्यात आले. **तसेच नागपुर ग्रामीण जिल्हयात सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीतांवर सतत कारवाई करण्यात येत आहे.**

**नागपुर ग्रामीण जिल्हयातील या विशेष मोहीमेअंतर्गत पोलीसांनी गुप्त सुत्रां मार्फतीने आतापर्यंत एनडीपीएस कायद्यांतर्गत १६३ आरोपीतांवर १६० गुन्हे नोंद केले आहे . आरोपीतांकडुन १३.०५९ किलो गांजा (अंमली पदार्थ ) एकूण २,२१,०६०/— रूपयांचा मृद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**